ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station अेसीबी पहिली खबर क्र. FIR No. २६ वर्ष Year २०१६ दिनांक Date ०६/०६/२०१६

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act - १९८८ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from ०४/०६/१६ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to ०४/०६/१६ वेळ Time ........

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date ०४/०६/१६ वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४१/१६ तारीख Date ०६/०६/१६ वेळ Time १०.३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी.

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. उ. २० कि.मी. उत्तरेस चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name दिंडोशी पो. ठाणे, मालाड (पूर्व), मुंबई ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
   (a) नाव Name श्री. राजेश शाह (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name प्रेमजी शाह
   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age ४८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. -
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward रूम नं. १०, हनुमान चाळ, रिंगा स्टेट रोड जे. ठाकूर कॉलेज जवळ, कांदिवली (पूर्व) मुंबई घर/नाव नंबर House/Name No. ........ फोन/मी. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ ओटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो.स्टे P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   श्री. विपीन चव्हाण, पोलीस उप निरीक्षक, दिंडोशी पो. ठाणे, मुंबई

श्री. राजेश प्रेमजी शाह, वय- ४८ वर्षे, व्यवसाय - कपड्याचा होलसेल व्यवसाय, रा.ठि:- रूम नं. १०, हनुमान चाळ, सिंग इस्टेट रोड नंबर, ठाकूर कॉलेज जवळ, कांदिवली (पूर्व), मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखित केलेल्या जबाब प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष,

[signature]

(रणजित पवार)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

[signature]
७/७/२०१८

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Records for delay in reporting by the Complainant/informant

90

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद तारीख वेळ व ठिकाणी यातील आरोपी विपीन चव्हाण, पोलीस उप निरीक्षक, दिंडोशी पो. ठाणे यांनी फिर्यादी विरुद्ध असलेल्या तक्रार अर्ज मिटवून टाकण्याकरीता साक्षीदार पंच क्र.१ श्री. अनिकेत जाधव यांच्या मार्फतीने फिर्यादीकडे रु.१०,०००/- ची लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणून गुन्हा कलम-७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८, प्रमाणे दाखल.

13. **केलेली कार्यवाही** .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा पोनि पवार ..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ..........

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]
१/१/२०१८

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU
सत्यमेव जयते
MUMBAI

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name (रणजित सत्यवान पवार)
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Coding No. of I. O. ..........

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

(के) -Form 1-A

# फिर्याद

दिनांक– ०७/०७/२०१८

श्री. राजेश प्रेमजी शहा, वय– ४८ वर्षे, व्यवसाय– कपडयाचा होलसेलचा व्यवसाय, रा.ठि– रूम नं. १०, हनुमान चाळ, सिंग इस्टेट रोड नं., ठाकुर कॉलेज जवळ, कांदिवली पुर्व, मुंबई.

.............

मी वरीलप्रमाणे असून मुंबईमध्ये जन्मापासून राहावयास आहे. गेल्या २५ वर्षापासून नमूद पत्त्यावर माझ्या कुटुंबियांसह रहावयास आहे. माझा कपडयाचा होलसेलचा व्यवसाय हा ३० वर्षापासून करीत असून त्यावर मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत आहे.

एप्रिल २०१८ मध्ये मी माझ्या ओळखीचा बाजारातील व्यापारी धिरजलाल शहा यांना त्यांनी टि शर्टचे सॅम्पल पिस दाखवले होते तेव्हा त्यांनी १००० पिसची मालाची आर्डर मला दिली होती सदर मालाची किंमत १,२०,०००/– होत होती. ऑर्डर दिल्यानंतर तीन दिवसांनी धिरजलाल यांनी अॅडव्हान्स म्हणुन ३८,०००/– रूपये मला दिले होते. सदरचे पैसे मी ज्या व्यापा–याकडून माल खरेदी करणार होतो. त्या व्यापा–याला पैसे देवून मालाची ऑर्डर दिली. त्यानंतर मे २०१८ च्या पहिल्या आठवडयामध्ये धिरजलाल यांनी दिलेली ऑर्डर रदद् केली व त्यांचे पैसे परत मागितले. परंतु ते पैसे मी व्यापा–याला अगोदरच दिले असल्याने धिरजलाल यांना पैसे देवु शकले नाही. पुन्हा पाच सहा दिवसांनी धिरजलाल हे मला बाजारात भेटले असता त्यांनी मला पैशाची मागणी केली तेव्हा मी त्यास २०,०००/– व १८,०००/–रूपयाचे असे विजया बॅकेचे दोन चेक दिले व सदरचे चेक बॅकेत टाकण्यापुर्वी मी त्यांना सांगण्यास सांगितले. त्यांनतर काही दिवसांनी धिरजलाल यांनी मी दिलेले दोन्ही चेक हिंदुस्थान को–ऑपरेटिव्ह बॅकेत भरले. माझे खाते असलेल्या विजया बॅकेतुन मला फोन आला कि मी दिलेले दोन चेक पुरेशी रक्कम नसल्याने बाउंन्स झाले आहेत. तेव्हा मी धिरजलाल यांना फोन करून विचारले असता त्यांनी मला उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर धिरजलाल पुन्हा मला बाजारात भेटले असता मी चेक बाबत धिरजलाल यांना विचारले असता त्यांनी मला जेव्हा पैसे दयायचे तेव्हा दे असे बोलुन तेथुन निघुन गेले.

दि १४/०६/१८ रोजी दिंडोशी पोलीस ठाणे येथुन पोउपनि बिपीन चव्हाण यांनी मला फोन करून त्यांचेविरूध्द तक्रार अर्ज आलेला आहे व पोलीस ठाण्यास येवुन भेटण्यास सांगितले. तेव्हा मी दि १६/०६/१८ रोजी दिंडोशी पोलीस ठाणेस जावुन पोउपनि चव्हाण यांना भेटलो. तिथे त्यांनी मला ज्याच्याकडुन पैसे घेतले होते ते धिरजलाल शहा यांनी माझ्याविरूध्द केलेला तक्रार अर्ज दाखविला. त्या अर्जात धिरजलाल यांना दिलेले पैसे परत केले नाही म्हणुन तक्रार दिलेली असुन माझ्याविरूध्द गुन्हा दाखल करणार आहे असे सांगितले. थोडयावेळाने त्यांनी माझा जबाब नोंद केला. त्यानंतर मला सदरचा तक्रार अर्ज मिटविण्याकरीता चहापाण्याची मागणी केली. तेव्हा मी समोरच्या पार्टीला बोलवा असे सांगितले व समोरासमोर करू असे बोललो.

त्यानंतर दि.०४/०७/१८ रोजी मी व माझा लहान भाउ हंसराज प्रेमजी शहा, बहिण मंजुबेन कांतीलाल कारीया यांना घेवुन दिंडोशी पोलीस ठाणेस गेलो व तक्रारदार धिरजलाल यांना देखिल पोलीस ठाणेस बोलावुन घेतले. आम्ही असे सर्वजण तेथे पोउपनि चव्हाण यांना भेटलो. मी पोउपनि चव्हाण यांना त्यांचेसमोर धिरजलाल यांना १०,०००/– रूपये पहिले देतो व नंतर उरलेले पैसे देतो असे बोलले तेव्हा पोउपनि चव्हाण यांनी तक्रारदार धिरजलाल यांना बाजुला घेवुन काहितरी बोलुन तेथून बाहेर पाठवुन दिले. त्याचवेळी मला घरातून माझ्या पत्नीची तब्येत गंभीर असल्याबाबत फोन आल्याने मी घरी निघून गेलो व माझी बहिण श्रीमती मंजुबेन कारीया हिला पोउपनि चव्हाण यांचेशी बोलण्यास सांगितले. त्यानंतर पोउपनि चव्हाण यांनी माझ्या बहिणीला धिरजलाल यांना जे १०,०००/– रूपये देणार आहे ते त्यांना स्वत:ला देण्यास सांगुन त्यानंतर ते सदरचा अर्ज मिटवुन टाकतील असे बोलले व सदरचे दहा हजार रूपये ०५/०७/१८ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत घेवुन न आल्यास गुन्हा दाखल करणार असल्याचे देखिल सांगितले. मी दिनांक ०५/०७/१८ रोजी लोकसेवकास भेटण्यास जाणार आहे. परंतु सदर लोकसेवक यास मला लाचेची रक्कम देण्याची इच्छा नाही असे मी माझ्या बहीणीस सांगितले.

समक्ष,

(signature) ७/७

( रणजित पठारे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature)
७/७/२०१८

तेव्हा माझी बहीण मंजूबेन कारीया हिने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील १०६४ या दुरध्वनीवर संपर्क साधला असता पो.नि. पठारे यांनी तक्रारीबाबत विचारणा करून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येवून तक्रार देण्यास सांगितले असता मी व माझी बहीण श्रीमती कारीया उदया येत असल्याचे त्यांना सांगितले. त्याप्रमाणे मी व माझी बहीण दि.०५/०७/१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात पोहचून पो.नि. पठारे यांना भेटलो. त्यानंतर पो. नि. पठारे यांनी मला वरिष्ठ अधिका—यांची भेट घेवुन त्यांचेकडे लोकसेवक चव्हाण यांचेविरोधात तक्रार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मला पो.नि. पठारे यांनी विचारलेवरून माझे शिक्षण गुजराती भाषेतून झाले असल्याचे व मला यांना मराठी, हिंदी लिहीता येत नसुन फक्त मराठी वाचता येत असल्याचे सांगितले म्हणून पोलीस निरीक्षक पठारे व सपोआ चिंचकर यांनी मला गोपनिय कक्षात बोलावून घेतले त्यावेळी तेथे दोन इसम हजर होते. त्यांची ओळख शासकीय पंच अशी करून दिली व माझी तक्रार संगणकावर टंकलिखित करून मला वाचण्यास दिली असता ती माझ्या सांगणेप्रमाणे बरोबर असल्याचे मी सांगितले. पोलीस निरीक्षक पठारे यांनी मी दिलेला लेखी तक्रार अर्ज शासकीय पंच यांना वाचण्यास दिला. त्यावेळी दोन्ही पंचानी सदरचा तक्रार अर्ज वाचून त्यावर स्वाक्षरी केली व समक्ष म्हणून पोलीस निरीक्षक पठारे यांनी स्वाक्षरी करुन सदरचा अर्ज त्यांच्याकडे ठेवून घेतला.

सदर लेखी तक्रार अर्जाबाबत पो.नि. पठारे यांनी मा.वरिष्ठांशी चर्चा करून दि.०५/०७/२०१८ रोजी पडताळणीचे आयोजन केले. त्यामध्ये मी व दोन्ही पंच यांचे व्यक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर मी, पंच व पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून बाहेर पडून कार्यालयाच्या आवारात उभी असलेली सफेद रंगाची टाटा सुमो जिप क्र. एमएच—०४ एएन—१७०४ व सफेद रंगाची बुलेरो क्र. एमएच—०४ एएन—३५६७ दिसून आली. सदर वाहनावरील चालक पो.ना.चाक्र. ९८०८२६/शिवतरे, व पो.शि. चा.क्र. १४—१३६२/ पाटील अशी पो.नि. पठारे यांनी त्यांची ओळख फिर्यादी व दोन्ही पंच यांना करुन दिली. त्यानंतर पो. नि. पठारे यांच्या सुचनेवरुन मी स्वत: पो.नि. पठारे, दोन्ही पंच, तक्रारदार श्री. राजेश शहा, त्यांची बहीण मंजूबेन कारीया स.पो.आ. चिंचकर, व सापळा पथक असे सफेद रंगाची टाटा सुमो जिप क्र. एमएच—०४ एएन—१७०४ मध्ये बसले व उर्वरीत पोलीस पथक सफेद रंगाची बोलेरो क्र. एमएच—०४ एएन—३५६७ यामध्ये बसले. त्यानंतर लोकसेवक यांच्या पोलीस स्टेशनच्या जवळ गोपनियरित्या थांबून राहिलो.

नंतर मी व माझे सोबत पंच क्रमांक १ श्री. अजिंक्य जाधव यांना सुचना देवून मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पडताळणी करीता लोकसेवक यांचे कार्यालय असलेल्या ठिकाणी पाठविण्यात आले. त्यानंतर काही वेळाने मी व पंच हे ज्या ठिकाणी पोलीस वाहन थांबले होते त्याठिकाणी आलो त्यानंतर माझा डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर पंचासमक्ष बंद करण्यात येवून त्यातील लोकसेवक, मी व पंच यांचेमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पो.नि. पठारे यांनी व स.पो.आ. चिंचकर ऐकले. त्याप्रमाणे पंच क्र.१ श्री.अजिंक्य जाधव हयांना त्याबाबत विचारले असता त्यांनी अशी माहिती दिली की, " मी व पंच क्रं. १ श्री. अजिंक्य जाधव हे लोकसेवकाच्या कार्यालयात गेल्यानंतर तेथे लोकसेवक यांनी माझ्याशी तक्रार अर्जाबाबत चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक यांनी पंच क्र.१ श्री. अजिंक्य जाधव यांना त्यांच्या कार्यालयातून बाहेर घेवून असे सांगितले की, " दहा हजार दयावे लागतील काही कमी होणार नाय... तु सांग त्यांना," त्यावेळी पंच क्र. १ यांनी लोकसेवक यांना "

समक्ष,

PHathare 5/7/18
( रणजित पठारे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

21822/म 7 212
7/7/2018

सर तुम्हीच सांगा त्यांना '' असे सांगितल्यानंतर लोकसेवक यांनी पंच क्र.१ यांना '' तुच सांग... '' असे बोलल्याचे सांगितले.

तसेच थोडयावेळाने '' लोकसेवक यांनी पंच क्र.१ यांना जाधव अशी हाक मारून कक्षा मध्ये बोलावून घेतले पंच क्र १ तेथे गेले दृ लोकसेवक यांनी पंच क्र. १ यांना ती रक्कम तुझ्याकडे घेवून मला आणून दे '' असे सांगितले. त्यावर पंच क्र.१ यांनी लोकसेवक यांना '' तुम्हीच श्री. शहा यांच्याशी बोला '' असे सांगितले असता लोकसेवक यांनी पंच क्र. १ यांनाच सांगण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.१ हे कक्षाबाहेर आला आणि मला कार्यालयाच्या बाहेर उभे असल्याचे पाहिले तेव्हा पंच क्र.१ हे माझ्याजवळ येवून लोकसेवक यांनी पंच क्र.१ यांचेकडे रू.१०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले.

तसेच मी व पो.नि. पठारे यांनी पडताळणीमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण काळजीपुर्वक ऐकले असता पंच क्र.१ व माझ्यामध्ये लोकसेवकाच्या कार्यालयात झालेले संभाषण खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| पंच क्र. १ | ते म्हणालेत की माझ्याकडे पैसे दया... ते म्हणलेत की तुमच्याकडून घेवून त्यांच्याकडे दया... |
| मी | नाहीत... |
| पंच क्र. १ | तुम्हीच सांगून या... |
| मी | तूच सांगून ये... मी येतो ... |
| पंच क्र. १ | अं... |
| मी | येतो म्हणून पंधरा वीस मिनटात |
| पंच क्र. १ | कोण मी... |
| मी | हं.... |
| पंच क्र. १ | मी का तुम्ही... |
| मी | आम्ही दोघे येतो म्हणा... पैसे घेवून येतो... |
| पंच क्र. १ | तुम्ही सांगा मी पैसे नंतर देतो म्हणून.... |
| मी | ठिक आहे चल जाधव... |
| पंच क्र. १ | हं.... |

माझे लोकसेवक चव्हाण यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य नसून मी दि.०५/०७/२०१८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पो.नि. पठारे यांनी आयोजित केलेल्या पडताळणी मध्ये लोकसेवक पोउपनि चव्हाण यांनी माझे विरूध्द असलेला तक्रार अर्ज मिटवुन घेण्याकरीता पडताळणी दरम्यान माझ्यासोबत असलेले पंच क्र.१ श्री. अजिंक्य जाधव यांचे मार्फतीने माझेकडे रुपये १०,०००/- लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले, म्हणून माझी त्यांचेविरुध्द फिर्याद असून योग्य ती कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष
[signature]
( रणजित पठारे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

७/७/२०१८